प्रशासकीय कामकाजाचे अधिकार प्रदान करणेबाबत...
पारपत्र सुविधेसाठी "ना-हरकत प्रमाणपत्र" मिळणे बाबत..

जिल्हा परिषद अहिल्यानगर
सामान्य प्रशासन विभाग -१
जिल्हा परिषद आदेश क्र.साप्रवि-१/र.व.का/५२ /२०२५
अहिल्यानगर दिनांक२२/०१/२०२५

वाचा:- १) महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील नियम ९५ व ९६ (१)
२) या कार्यालयाकडील सुधारित आदेश क्र.साप्रवि/रवका६९६/२०१६, दि.१७/०६/२०१६
३) या कार्यालयाकडील आदेश क्र.साप्रवि/रवका/४२१/२०१८, दि.०५/०४/२०१८.
४) शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्रं.टीआरजी-१४६९/सी-८८२९-डी-१ दि.३० सप्टेंबर १९६९
५) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्र.सीडीआर-१०८५/१३१८/३१/अकरा दि.३० सप्टेंबर १९८५.
६) कार्यालयीन मंजुर टिपणी दि२२/११/२०२४.

-: आदेश :-

उपरोक्त शासन परिपत्रकानुसार महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्र.सीडीआर-१०८५/१३१८/३१/अकरा दिनांक ३० सप्टेंबर १९८५.नुसार शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्रं.टीआरजी-१४६९/सी-८८२९-डी-१ दि.३० सप्टेंबर १९६९ मधील सुचनांनुसार पारपत्र मिळवू इच्छिणा-या शासकीय कर्मचा-याने पारपत्रासाठी आवेदन देण्यापूर्वी त्यांच्या विभाग प्रमुखांकडून व विभाग प्रमुखाने शासनाकडून ' "ना-हरकत प्रमाणपत्र " प्रमाणपत्र मिळवणे अवश्यक आहे. प्रकरणी जि.प.कर्मचा-यांना पारपत्र देण्याबाबत चे अधिकार विभाग प्रमुख म्हणुन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यांना आहेत .

प्रशासकीय कामकाजाचा जलद गतीने निपटारा व्हावा या अनुषंगाने सदर अधिकारांच्या मर्यादा वाढविणे तसेच इतर काही अधिकार नव्याने देणे विचाराधिन होते. त्यानुसार मी मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद अहिल्यानगर महाराष्ट्र जिल्हा परिषदा व पंचायत समित्या अधिनियम १९६१ मधील नियम ९५ व ९६ (१) नुसार दिलेल्या अधिकाराचा वापर करून महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्र.सीडीआर-१०८५/१३१८/३१/अकरा दिनांक ३० सप्टेंबर १९८५.नुसार परिपत्राका मध्ये दिलेल्या अटी व शर्तीना अधिन राहून पारपत्र सुविधेसाठी "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्याबाबत शासनाने प्रदान केलेले अधिकाराचा वापर करुन सोबतच्या जोडपत्रात नमूद केल्याप्रमाणे खाते प्रमुख, जिल्हा परिषद यांना प्रदान करण्यात येत आहे.

सोबतचे जोडपत्रामध्ये मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर संबंधित खाते प्रमुख यांनी कायदा, नियम व शासनाचे आदेशाच्या अधिन राहून करण्याची दक्षता घ्यावी. सदर अधिकार कोणत्याही वेळी व कोणत्याही कारणाने काढून घेण्याचे अधिकार राखुन ठेवण्यात येत.सदर आदेश अहमदनगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संगणक संकेतांक क्रमांक -202501220400010---------असा आहे.
सोबत - जोडपत्र जोडले आहे.

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 22-01-2025 12:39:21
(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

१) सर्व खाते प्रमुख, जिल्हा परिषद अहिल्यानगर
२) सर्व गटविकास अधिकारी, पंचायत समिती सर्व

कार्यालयीन कामकाजासाठी अधिकार प्रदाण करणे बाबत.

जोडपत्र आदेश क्र. साप्रवि-१/रवका/५२ /२०२४ दिनांक२२/०१/२०२५

| अ. क्र. | अधिकाराचा प्रकार | कोणत्या प्राधिकारान्वये अधिकार मा.मु.का.अ. यांना अधिकार प्राप्त झाले आहेत. | कोणत्या नियमान्वये सदरचे अधिकार प्रदान करतास येतील ? | अधिकार प्रदान करावयाचा आहे त्या अधिका-यांचे पदनाम | प्रदान केलेल्या अधिकाराची व्याप्ती | शेरा |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ |
| १ | पारपत्र सुविधेसाठी "ना-हरकत प्रमाणपत्र " मिळणे बाबत.... | १. शासन परिपत्रक सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्रं.टीआरजी-१४६९/सी-८८२९-डी-१ दि.३० सप्टेंबर १९६९ .<br>२. महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग,परिपत्रक क्र.सीडीआर-१०८५/१३१८/३१/अकरा दिनांक ३० सप्टेंबर १९८५. | म.जि.प.व पं.स. अधिनियम १९६१ चे कलम ९६ (१) | खाते प्रमुख (सर्व), जिल्हा परिषद अहमदनगर | खाते प्रमुख यांच्या अधिनस्त संवर्गातील गट -क व गट-ड कर्मचारी | पूर्ण अधिकार |

Signed by
Ashish Mukundrao Yerekar
Date: 22-01-2025 12:38:55
(आशिष येरेकर, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर